

# खेळघर

पालकनीती परिवाराचा प्रकल्प

## वार्तापत्र

### ऑगस्ट २०२५ ते जुलै २०२६

पालकनीतीच्या खेळघराचं हे तिसावं वर्ष! १९९६ साली घरातल्या घरात झोपडवस्तीतील मुलांसमवेत सुरू केलेलं हे काम आज कितीतरी बहरलं आहे, विस्तारलं आहे. सुरुवातीच्या ५-१० मुलांपासून आता संख्या २००च्या घरात गेली आहे. आज लक्ष्मीनगर वस्तीतील खेळघरातून बाहेर पडलेली सुमारे २०० मुलं मुली चांगलं शिक्षण घेऊन सन्मानानं स्वतःच्या पायावर उभी आहेत.

हे काम करता करता अनुभवातून आणि अभ्यासातून वंचित मुलांबरोबर ह्या कामाच्या संकल्पना आमच्यासाठी स्पष्ट होत जात आहेत आणि काम अधिक नेमकं होतं आहे. त्यातूनच खेळघरानं वस्तीपातळीवरच्या कामाचं एक प्रारूप समाजापुढं मांडलं. ते विकसित करत नेलं. 'आनंदाने शिकण्याच्या दिशेने...' या संकल्पनेचा महाराष्ट्रात आणि इतर राज्यांमध्ये विस्तार व्हावा यासाठी २००७ पासून सातत्यानं प्रशिक्षणं घेतली, वेगवेगळ्या संस्थांना त्यांची कामे सक्षमतेनं उभी रहावीत म्हणून वेळोवेळी मदत केली. कार्यकर्त्यांच्या अशा प्रशिक्षणांच्या माध्यमातून अनेक मुलांपर्यंत खेळघर पोचत आहे.

हे काम कुणा एकट्या दुकट्याचं नाही. अनेक समविचारी कार्यकर्त्यांचं योगदान या कामासाठी लाभलं आहे. आपल्यापैकी देखील अनेकांनी स्वतःचा पैसा वेळ आणि कौशल्यं या कामासाठी दिली आहेत.

या कामाची तिशी साजरी करण्यासाठी या वर्षीच्या 'थेट भेट' कार्यक्रमात आपण भेटायचं नक्की ठरवू या.



### गेल्या वर्षभरात झालेल्या विविध उपक्रमांबद्दल थोडक्यात –

### जीवन–कौशल्यांचं काम –

- गेल्या वर्षी आम्ही मुलांच्या गणिती प्रज्ञेचा विकास व्हावा म्हणून काही मोड्यूल्सची आखणी केली. सुषमा यार्दी यांनी सुमित्रा मराठे आणि संध्या फडके यांच्या मदतीने कालमापनाचं मोड्यूल विकसित केलं.
- दुकान जत्रा – दिवाळीनंतरच्या दुकान जत्रेच्या दरम्यान वस्तू बनवणं, जाहिरात करणं याबरोबरच मुलं वस्तूंची किंमत ठरवणं, विक्रीतून झालेला नफा तोटा काढणं अशा गणिती संकल्पनाही शिकली.
- सायली ताम्हाणे हिनं 'मीमांसा' या उपक्रमाच्या माध्यमातून वर्षभर ५ वी– ६ वी च्या वर्गातील मुलांबरोबर विज्ञान, गणित आणि विचार कौशल्यं विकसित व्हावीत म्हणून काम केलं.
- रुबी रमा प्रवीण यांनी शिक्षकांच्या मनातली गणिताची भीती जावी म्हणून कार्यशाळा घेतल्या.
- दरवर्षी प्रमाणे डिसेंबरमध्ये प्रत्येक वर्गाची, युवकांची, पालकांची आणि आम्हा शिक्षकांचीदेखील सहल शिवनेरी, सिंहगड, झपूर्झा, सोमेश्वरवाडी, डेक्कन कॉलेज, पानशेत धरण अशा विविध ठिकाणी गेली होती. सहलीची ठिकाणे निवडताना मुलांना काही वेगळी माहिती / अनुभव मिळावेत असा निकष होता. या दरम्यान नकाशा, सहलीच्या ठिकाणाची आधी माहिती घेणं, बारकाईनं निरीक्षण करणं, एकमेकांना मदत करणं, नंतर चित्रं, लेखन, फोटो या माध्यमातून आपले अनुभव / मतं व्यक्त करणं, अशा विविध उपक्रमांमधून मुलं अनेक जीवन–कौशल्ये शिकतात.
- फेब्रुवारी महिन्यात विज्ञान दिनाच्या निमित्ताने महिनाभर प्राथमिकच्या मुलांबरोबर आहार आणि मोठ्या मुलांबरोबर आकाशनिरीक्षण या विषयावर काम झालं. नंतर मुलांनी या कामाच्या आधारावर मॉडेल्स बनवली होती आणि त्यांचं पालकांसाठी प्रदर्शन भरवलं होतं.



बर्ड व्हॅली उद्यानातली प्राथमिकच्या मुलांची सहल.

## या वर्षी साधलेल्या काही चांगल्या गोष्टी

- खेळघराचं काम करणाऱ्या पहिल्या फ़ळीतील कार्यकर्ते आता निवृत्तीकडं झुकू लागले आहेत. नवी फळी तयार होऊन त्यांनी कामाची जबाबदारी घेणं आता आवश्यक आहे. गेली तीस वर्षे पुढाकारानं काम करत असलेल्या शुभदा जोशींवरचं अवलंबित्व कमी व्हावं ही गरज प्रकर्षानं जाणवत होती. या वर्षी या कामाला गती आली. प्रियांका पाटील, अनुराधा चव्हाण, सुषमा कोल्हे आणि स्नेहा चामले या तरूण कार्यकर्त्यांनी पुढे येऊन विविध उपक्रमांची जबाबदारी स्वीकारली आहे. अर्थात त्यांना गरज लागेल तिथे जेष्ठ, अनुभवी कार्यकर्त्यांची मदत मिळेलच.
- इंग्लिशच्या वर्गांची घडी बसली आहे. वर्गाची ताई आणि स्वयंसेवी कार्यकर्ते असे मिळून आठवड्यातून एक इंग्लिशचा वर्ग घेतला जातो. मुलांच्या मनातली इंग्लिशची भीती कमी होऊन शिकण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहे.
- या वर्षी वाचनावर भरपूर काम झालं. आठवड्यातून एक वार खास वाचनासाठी ठेवला होता. मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून पुस्तकांशी जोडून अनेक उपक्रम घेतले.
- मुले आता आपण होऊन पुस्तकं हातात घेतात, काही मुलं घरी वाचायला देखील नेऊ लागली आहेत.
- आकाश खत्रावत खरगपूर IIT मधून B Tech झाला आहे. त्याला Tech Mahindra मध्ये जॉबची ऑफरही मिळाली आहे.
- गेली पाच वर्षे युवक गटात पुढाकारानं सक्रिय असलेल्या पाच मुलांनी BSC Vocational पदवी मिळवली आहे.
- या वर्षी दहावीच्या परीक्षेला बसलेली १२ मुलं उत्तीर्ण झाली आहेत. ७ मुलांना ६० च्या वर मार्क मिळाले आहेत. बारावीच्या ९ मुलांपैकी ४ मुली विज्ञान शाखेत, २ मुलगे कला शाखेत आणि वाणिज्य शाखेत एक मुलगी आहे. तसेच ३ मुलं ITI पास होऊन नोकरीला देखील लागली आहेत. ही सर्व मुलं बारावी नंतरही पुढील शिक्षण घेऊ इच्छितात. त्या दिशेनं शोध आणि प्रवेश प्रक्रिया चालू आहे.
- गेली तीन वर्षं करत असलेल्या प्रयत्नांमुळे १४–१५ स्वयंसेवी कार्यकर्त्यांची फळी तयार झाली आहे. त्यांची आवड, क्षमता आणि खेळघराची गरज यानुसार त्या विविध जबाबदाऱ्या सक्षमतेनं घेत आहेत. त्यासाठी करायच्या अभ्यास–निरीक्षणांसाठी देखील वेळ काढत आहेत.

- एप्रिलच्या शेवटी मुलांच्या परीक्षा झाल्यावर कला–आठवडा आयोजित केला होता. या वर्षी मुलांनी रणजित कोकाटे, रमाकांत धनोकर यांच्या मार्गदर्शनानुसार स्वातंत्र्य या विषयावर चित्रं काढली. राजू देशपांडे यांच्या चित्रांतून बोलणाऱ्या पुस्तकांचीही मदत घेतली.
- जूनमध्ये लेखन वाचनात मागं पडणाऱ्या मुलांसाठी शिक्षक आणि स्वयंसेवी कार्यकर्ते यांनी १२ दिवसांचे Remedial Workshop घेतलं. शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला मुलांना अशी वैयक्तिक मदत मिळाल्यामुळे त्यांचा शिकण्यातला रस वाढतो असा आमचा अनुभव आहे.

## आम्हाला जाणवणारी आव्हानं –

या वर्षीच्या मे महिन्यातल्या वार्षिक मूल्यमापनाच्या बैठकीत अनेक आव्हानं समोर आली.

- घरातील भांडणं, हिंसाचार, पैशांची सततची तंगी, वस्तीतील अशांत वातावरण, सणांच्या – महापुरुषांच्या जयंत्यांच्या आणि जाती–धर्मांच्या आधारे केलं जाणारं धृवीकरण, राजकीय गटांमधील तेढ हे वस्तीतील वातावरण मुलांच्या व्यक्तिमत्वावर विपरीत परिणाम करतच असतं.

– त्यासोबत गेल्या काही वर्षात मोबाईल नावाचा 'जीन' मुलांच्या हातात आला आहे. अगदी लहान मुलांमध्ये देखील मोबाईलचा वापर वाढला आहे. स्वतःकडे मोबाईल नसेल तरी मुलं हट्टानं पालकांचे मोबाईल मागून घेतात. सोशल मिडियाच्या माध्यमातून भावना भडकवणारा, उत्तेजित करणारा, गुंगवून टाकणारा असा content मुलांच्या हाताशी आला आहे.

या परिस्थितीचे मुलांवर अतिशय गंभीर परिणाम जाणवत आहेत.

– मुलांचा खूप वेळ आणि लक्ष मोबाईलमध्ये जातो. समोरच्या माणसाकडे लक्ष देणं, वेळ पाळणं, ठरवलेल्या गोष्टी करणं, नियम पाळणं, लक्ष देऊन ऐकणं ह्याचं महत्त्व कमी झालं आहे.

– प्रौढांसाठी तयार केलेला लैंगिक content सहज हातात मिळाल्यानं लहान वयातली प्रेमप्रकरणं, चिडवाचिडवी, अश्लील बोलणं, खाणाखुणा अशा गोष्टी वाढलेल्या जाणवतात.

– १२–१४ इतक्या लहान वयातली प्रेमप्रकरणं हाताळणं मुलांना कठीण जाते. त्यातून फसवणूक, घरच्यांची मारहाण, गावी पाठवून देणं, नकार पचवणं या सगळ्यातून येणाऱ्या नकारात्मक भावनांचं समायोजन करायला कुठूनही मदत मिळत नाही.

इयत्ता पहिलीचा सुरुवातीच्या काळातला एक वर्ग! मुलं नुकतीच पूर्ण वेळाच्या शाळेत जाऊ लागली होती. अजून ती खेळातून, दंगा करण्यातून शिकत होती. एका जागी बसून ऐकायला, शिकायला त्यांना अवघड जात होतं. शाळेत ते करावंच लागतं. खेळघरात मात्र चालतंय... असं वाटायचं.

वर्गात आल्यावर मुलांना नुसत्या उड्या मारायच्या असायच्या. जमीर तर वर्गात आला की रोज कोलांटी उड्या मारायलाच सुरुवात करायचा. त्याला मी म्हटले की, आपण कॉर्नर मधलं काम झालं की उड्या मारूयात. आज आपल्याला उड्या मारायचाच खेळ खेळायचा आहे.

मग थोडा वेळ मुलं कॉर्नर्समध्ये रमली.

नंतर मी डफली वाजवायला सुरुवात केली. मदारीसारखा खेळ घेतला. 'जमुरे, अभी जमीर उडी लगायेगा', असं म्हटलं. सगळ्या मुलांना खूप मज्जा वाटली. 'जमीर कितना उडी लगाके दिखायेगा?' लगेच मुलांनी सांगितले, 'दस'.

त्यानंतर मुलंच आकडा ठरवत होती आणि तेवढ्या उड्या मारत होती.

एक ते दहा आकड्यांचा भरपूर सराव झाला आणि मुलांना भरपूर दंगा करायला मिळाला. त्याला जोडून मी 'हुप्पा हुय्या क्रिकेट कल्ला' ही गोष्ट वाचायला घेतली. त्यात माकडांची चित्रं आणि संवाद होते.

'आली माकडं आली आणि बॉल घेऊन गेली', असं म्हणलं की मुलं सगळी माकडं जशी ॲक्शन करतात तशीच ॲक्शन करत होती. मुलं परत जागेवर येऊन बसावीत म्हणून मी म्हणाले, 'अभी सब बंदर जगह पे आकर बैठेंगे', की सगळेजण परत जागेवर येऊन बसत होते. गोष्ट ऐकायचे आणि परत माकडासारखे उड्या मारून माकडाची ॲक्टिंग करायचे. मुलांनी गोष्ट खूप छान ऐकली, शेवटी सगळे बंदर घरी जायला निघाले. एकटा किरण राहिला. तो खिडकीत चढला आणि म्हणाला, 'अरे एक बंदर रहे गया। तो अभी ये बंदर भी घर जायेगा.'

खूपच मजेशीर झाला कालचा वर्ग! मला खूप मजा आली आणि मुलांनाही खूप मजा आली. काही वेगळाच आनंद होता मुलांच्या चेहेऱ्यावर!

**सपना लंगडे**

- मुलांमधील गटबाजी, भांडणं, वस्तीतील गुन्हेगारीकडं ओढलं जाण्याचं प्रमाण देखील वाढलं आहे.
- याचा परिणाम वर्गातील मुलांच्या संख्येवर देखील होताना दिसतो. एकूण २०-२५ मुलांपैकी १५ -१६ मुलंच नियमित असतात.
- गेल्या वर्षी खेळघराच्या टीममध्ये तीन शिक्षिका नव्यानं जोडल्या गेल्या होत्या.

  त्यांना खेळघराच्या पद्धतीची आणखी सखोल जाण येणं आवश्यक आहे हे जाणवलं.
- खेळघराच्या कामाला तीस वर्षे पूर्ण होत आहेत ही खरंतरं आनंदाची गोष्ट! या निमित्तानं मुलं, माजी विद्यार्थी, पालक, प्रशिक्षण घेतलेल्या संस्थांचे कार्यकर्ते, मित्र-सुहृद, माजी कार्यकर्ते अशा सर्वांच्या समवेत हा आनंद साजरा करावा असं वाटतं. पण त्यासाठीचा वेळ, पैसे कुठून आणायचे? या उत्साहाच्या भरात नेहमीची कामं मागे पडायला नको. अशी चितादेखील वाटते.
- खेळघराचं लक्ष्मीनगरमधील मुलांबरोबरचं काम, पालक प्रकल्प, युवक प्रकल्प या तीनही प्रकल्पांना आर्थिक मदतीचा पर्याय अजून समोर आला नाही. शशिकला फौंडेशन, Fluid Control Ltd. आणि जठार ट्रस्टकडून प्रकल्पाच्या काही भागांना आर्थिक मदत मिळाली आहे. प्रशिक्षणांच्या प्रकल्पाला विप्रो फौंडेशनची मदत आहे. मुलांना दहावीच्या पुढचं शिक्षण घेण्यासाठीची मदत आपल्यासारख्या मित्र सुहृदांकडून विश्वासाच्या बळावर जमा होते. इतर प्रकल्पांसाठी आम्ही आर्थिक मदत कुठून मिळवू शकतो, या बद्दलची माहिती आम्हाला जरूर कळवावी.

## पालकनीती खेळघराची दुकानजत्रा, एक आनंद मेळा



दिवाळीनंतरचा सगळा वेळ खेळघर दुकानजत्रामय झालं होतं. एखादं छोटं ध्येय असलेली सामूहिक कृतीदेखील वातावरण किती उत्साह- आनंदानं भरून टाकतं याचं प्रत्यंतर आलं.

दुकानजत्रेच्या निमित्तानं मुलांना एखादा बिझीनेस करण्यासाठी आवश्यक अशा कौशल्यांचा परिचय करून देणारा एक संवादगट शिक्षकांबरोबर आणि नंतर मुलांबरोबर प्लॅन केला होता.

दुकानजत्रा म्हणजे व्यवहारिक कौशल्यं शिकण्याची सुवर्ण संधीच! तोंडी गणितं करणं, वस्तूंची किंमत काढणं, नफा-तोटा अशा अनेक संकल्पना मुलांबरोबर कशा घ्यायच्या या विषयांवर शिक्षकांची सत्रं सुमित्राताईंनी घेतली.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलांनी वस्तू कशा बनवायच्या ते शिकून घेऊन, चिकाटीनं पुन्हा पुन्हा करून त्यात प्रावीण्य मिळवून finished वस्तू मोठ्या संख्येनं बनवणं, त्यांचं पॅकिंग, जाहिरात अशा सर्व फ्रंट्सवर पुढाकारानं काम केलं. अभ्यास विषय शिकतानाचा कंटाळा इथं पार पळून गेला होता.

प्रत्यक्ष कार्यक्रम चांगलाच झाला. मुलं, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक, स्वयंसेवी कार्यकर्ते आणि पाहुणे अशा तीनेकशे लोकांचा सहभाग असलेला हा मेळा सगळ्यांच्या मनात उत्साह आणि प्रेरणा जागवणारा होता.

नंतरच्या आठवड्यात या कार्यक्रमाचं मूल्यमापन झालं. संवादातून काय जमलं काय हुकलं यावर विचार झाला. प्रत्येक वर्गात मुलांबरोबर नफा तोटा काढला गेला. मुलांच्या श्रमाच्या पैशांचं काय करायचं हे सर्वसहमतीनं ठरलं. पालकसभा घेतली गेली. त्यात मुलांनी या उपक्रमातून ती काय शिकली याबद्दल मांडणी केली.

सर्व शिक्षकांनी अतिशय मनापासून काम केलं, जबाबदारी घेतली. स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा देखील कार्यक्रमात पुढाकार होता. युवक गटाच्या मुलांनी देखील शक्य ती सर्व मदत केली अगदी शेवटच्या आवराआवरीपर्यंत!

## उपायांच्या दिशेनं

- गेली दोन वर्षे मुलांच्या लैंगिकता शिक्षणाची जबाबदारी आम्ही प्रयास या संस्थेच्या 'सहज' या प्रकल्पातील कार्यकर्त्यांकडे सोपवत असू. परंतु या वर्षी आम्ही ठरवले की लैंगिकता शिक्षणातील काही कोअर विषयांसंदर्भात सहजची मदत जरूर घेऊ मात्र त्याच्या आधी आणि नंतरही आम्हाला काम करणं गरजेचं आहे. माझं शरीर, मैत्री हवी – दुष्मनी नको, नातेसंबंधातील मूल्यं, मैत्री-आकर्षण-प्रेम, भावनांचं समायोजन, media literacy, लिंगभाव समता अशा विषयांवर content बनवण्याच्या कामाला शुभदा, राधा, ज्योती आणि अनुराधा यांच्या गटानं सुरुवात केली आहे. त्यानुसार शिक्षकांचं प्रशिक्षणं घेतली जातील.
- या वर्षी पाहिल्यांदाच मे महिन्यात १२ दिवसांच्या शिक्षक प्रशिक्षणाची आखणी केली होती. गणित, भाषा आणि जीवन कौशल्यं या तीनही विषयांवर सलग काम झालं. यातून खेळघराच्या पद्धती आणि दृष्टीकोन शिक्षकांमध्ये चांगले रुजतील असं वाटतं. या प्रशिक्षणांमध्ये शिक्षकांना शिकवतांना पडणाऱ्या प्रश्नांवर खूप सखोल काम झालं.
- मुलांच्या गृहभेटी आणि पालकांशी संवाद वाढवण्याचं ठरवलं आहे.
- शिक्षकांचे मुलांबरोबरच्या कामाचे तास वाढवले आहेत. त्यामुळे वर्गातील मागं पडणाऱ्या मुलांना मदत मिळण्याची शक्यता वाढेल.

## पालकांबरोबरचं काम

आधी खेळघराचे पालक आणि नंतर खेळघरात शिक्षक म्हणून काम करणाऱ्या ४ महिला सध्या टीममध्ये सहभागी आहेत. अर्थातच पालक प्रकल्पात त्यांचा पुढाकार आहे. कोविडनंतरच्या काळात खेळघर संकल्पनेत रस असणाऱ्या आणि शिकण्यासाठी उत्सुक असलेल्या अशा काही पालकांचा 'खेळघर मित्र' म्हणून एक गट बनला आहे. या गटातील महिला दर शनिवारी दुपारी भेटतात. गप्पा, खेळ, शेअरिंग, वाचन, काहीतरी नवीन शिकणं अशी रचना असते. खेळघरातील शिक्षिका आळीपाळीनं या गटाच्या संवादक म्हणून काम करतात. याच गटातून पुस्तक पेटीच्या उपक्रमाची सुरुवात झाली. ७-८ महिला त्यांच्या घरातच पेटी वाचनालय चालवतात. त्यासाठी त्यांना खेळघराकडून प्रशिक्षण दिलं जातं. महिन्यातून एकदा संध्याकाळी सर्व पालकांची पालकसभा असते. पालकत्वाशी जोडून, मुलांशी संवाद, सकारात्मक शिस्त, मोबाईलच्या अति वापराचे परिणाम, व्यसनं, मुलांच्या शिक्षणाचं माध्यम, कौटुंबिक हिंसा अशा अनेक विषयांवर संवाद होतो. या वर्षी 'आवर्जून केलेल्या गृहभेटी' या सुटून जाणाऱ्या मुद्द्यांवर काम करायचं ठरवलं आहे. स्नेहा चामले यांनी या गटाच्या समन्वयाची जबाबदारी घेतली आहे. वैशाली वहीकर ताई साधन व्यक्ती म्हणून काम करणार आहेत.

मुलांच्या घरात होणारा थोडा फार बदल सुद्धा मुलाच्या विकासात फार चांगली भर घालू शकतो हा विश्वास ह्या कामाला गती देतो.



पालकांची कार्यशाळा

## खेळघराचा विस्तार प्रकल्प

२००७ सालापासून आधी टाटा ट्रस्टच्या सहाय्यानं आणि आता २०२१ पासून विप्रो फौंडेशनच्या मदतीनं खेळघर वस्तीपातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दरवर्षी भारतभरातल्या सुमारे २५ कार्यकर्त्यांसाठी online, offline आणि action learning project असा एकूण १५ दिवसांचा कोर्स हिंदीमधून घेतला जातो. या कोर्सचं हे पाचवं वर्ष आहे. त्याबरोबरच काही संस्थांचं close mentoring देखील करत आहोत. या वर्षी गुजराथमधील 'समावेश' आणि ओरिसामधील "YSD" या संस्थांबरोबर काम करत आहोत.

या व्यतिरिक्त विद्योदय, वर्धिष्णू, Pro action Foundation, Yardi Foundation या संस्थांबरोबर प्रशिक्षणं घेतली. गेल्या वर्षी खेळघरानं आयोजित केलेल्या तीन दिवसांच्या जीवन-कौशल्यं या विषयावरच्या कार्यशाळेला महाराष्ट्रभरातून खूप छान प्रतिसाद मिळाला.

## स्वयंसेवी कार्यकर्त्यांबरोबरचे काम

ज्यांना समाजासाठी काहीतरी करावंसं वाटतं अशी समविचारी मित्र मंडळी वेगवेगळ्या टप्प्यांवर जोडली गेली आहेत. कामातील अनेक जबाबदाऱ्या सांभाळत आहेत.

खेळघरात अशा स्वयंसेवी कार्यकर्त्यांसमवेत दर महिन्याला एक मिटिंग घेतली जाते. आपली आवड, क्षमता आणि कामाची गरज या निकषांवर आपण काय काम करू शकतो याचा निर्णय या मिटिंगमध्ये होतो. त्यानंतर त्यांनी काही अभ्यास, वर्ग निरीक्षणं, संबंधित शिक्षकांशी संवाद करणं अपेक्षित असतं. त्यातून 'आनंदाने शिकण्याच्या दिशेने...' या खेळघराच्या पद्धतीची त्यांना चांगली ओळख होते आणि कार्यकर्ते अधिक परिणामकारक पद्धतीनं काम करू शकतात. त्यांना कामात येणाऱ्या अडचणी, प्रश्न, आनंदाच्या जागा याबद्दल मीटिंगमध्ये मांडणी करायला प्रोत्साहन दिलं जातं. शिवाय प्रत्येक मीटिंगमध्ये कार्यकर्त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळावं अशीदेखील योजना असते. त्यांनी प्रत्यक्ष काम नाही केलं तरी चालेल पण मीटींगला मात्र नेमानं यावं असं आमचं सांगणं असतं. त्यातून त्यांचं खेळघराशी जे नातं निर्माण होतं ते आमच्यासाठी फार महत्त्वाचं आहे.

गेल्या दोन-तीन वर्षांच्या या कामातून १५-२० कार्यकर्ते खेळघराशी चांगले जोडले गेले आहेत.

स्वप्नील चौथीपासून खेळघरात येतो. तो तीन भावंडांमधला धाकटा आहे. आई घरकामाला जाते व वडील गवंडी काम करतात. स्वप्नील माध्यमिक गटात ६वी मध्ये शिकत आहे. सुरुवातीला तो अनियमित होता. अभ्यासातही थोडा मागे होता, एका जागी फार वेळ बसू शकत नव्हता. ऐकून घेण्याची क्षमता अजिबात नव्हती. ताईसोबत मोकळेपणानं बोलणं होत नसे. कधी- कधीच तो वर्गाला यायचा पण पूर्ण वर्ग उधळून लावायचा. खेळणी तोड -फोड करणं त्याला आवडायचं. त्याला वाटायचं खेळघर म्हणजे फक्त मज्जा आणि दंगा मस्ती! सतत स्वतःकडं लक्ष वेधून घेण्याचा त्याचा प्रयत्न असायचा.

एकदा त्यानं वर्गात इतरांनी बनविलेल्या वस्तूंची तोड-फोड केली. त्यामुळे मी त्याच्यावर नाराज झाले. काही दिवस त्याला वर्गाला नको येऊ म्हणून सांगितलं. पण त्याला वर्गाला यायचं होतं. मी त्याच्याशी घरी जाऊन वैयक्तिक संवाद साधल्यानंतर तो परत वर्गाला यायला लागला. मी ठरवलं की रोज १० मिनिटं त्याच्याशी वैयक्तिक संवाद करायचा. त्यानं दिवसभरात काय-काय केलं, शाळेत काय झालं, चांगलं - वाईट, कुणाशी भांडण झालं वगैरे असं रोज बोलत असताना त्याला आपलेपणा जाणवला व तो स्वतःहून शाळेत किंवा बाहेर मित्रांसोबत झालेली भांडणं, झालेल्या चांगल्या - वाईट गोष्टी मला सांगू लागला.

मला समजलं त्याचं संवाद कौशल्य चांगलं आहे, तेव्हा मी त्याला स्वतःहून वर्गात बोलायची संधी/जबाबदारी द्यायला लागले. हे त्याला आवडू लागलं.

दुकानजत्रेपासून तो नियमित झाला. रोज आवरून नियमित वर्गाला येऊ लागला. त्याला माहीत होतं की ज्यांना गणित जमतं, हिशोब येतो त्याच मुलांना दुकानजत्रेत वस्तू विकायला प्रत्यक्ष उभं राहता येईल. तेव्हापासून तो अभ्यासाकडं वळू लागला. रोजचा वर्गातला अभ्यास करायचा प्रयत्न करू लागला. त्याची extra energy तो चित्र काढण्यात, वेगवेगळ्या वस्तू तयार करण्यात घालवू लागला.

आता त्याला माझी मदत घेऊन पुस्तक वाचन करायला व वाचलेल्या पुस्तकावर चित्र काढायला देखील फार आवडतं. आता तो माझं व इतरांचं म्हणणं ऐकून घेतो, इतर मुलांना बोलायची संधी देतो, त्याच्या वागणुकीत बऱ्यापैकी स्थिरपणा जाणवतो आणि तो वर्गाला पूर्ण वेळ थांबतो. वर्गानं त्याला आणि त्यानं वर्गाला आपलं म्हटलं आहे.

**सपना राऊत**




नर्मदा बालमेळ्यात खेळघरातल्या युवकांचा सहभाग

'लक्ष्मी हेडलगी' ही हुशार मुलगी! दहावीला ७२ टक्के मार्क मिळाले होते. घरची परिस्थिती अतिशय कठीण! तिनं लवकरात लवकर नोकरी मिळेल असं शिक्षण घ्यायचं असं शाळेत असतानाच ठरवलं होतं. दहावीनंतर तिनं ITI ला Mechanical draftsman या शाखेत प्रवेश घेतला. दोन वर्षात ७५ टक्के मार्क मिळवून कोर्स पूर्ण केला. लगेचच ती Tata Motors मध्ये paid internship करू लागली. नोकरी करता करता तिला स्वत:च्या इंग्लिशवर काम करायचं आहे.

आतापर्यंत खेळघरातील मुली ITI ला प्रवेश घ्यायला बिचकत असत. पण या वर्षी तीन मुलींनी ITI ला प्रवेश घेतला आहे. लक्ष्मीचा आदर्श त्यांच्यासमोर आहे.

## बालमेळा – नर्मदा नव निर्माण अभियानात खेळघराच्या युवकांचा सहभाग!

खेळघरातील एक युवक सांगत होता, ''आम्ही पहिल्यांदाच आमच्या कंफर्ट झोन मधून बाहेर पडलो. या निमित्तानं, आपल्यापेक्षादेखील कठीण परिस्थितीत राहणाऱ्या या लोकांकडं बघून आम्हाला आपल्या समाजाचं भान आलं.''

नर्मदा आंदोलनाकडून नर्मदाकाठच्या धरणग्रस्त गावांमधील मुलांसाठी जीवन शाळा चालवल्या जातात. जीवनशाळांमध्ये शिकणाऱ्या शेकडो आदिवासी मुलांचा, पालकांचा, शिक्षकांचा आणि ग्रामसाथींचा आनंदोत्सव म्हणजेच बालमेळा! बालमेळाव्यात रॅली, प्रदर्शनं, विविध खेळांच्या स्पर्धांचं आयोजन करण्यात येतं. नंदुरबार इथे १९ ते २२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित या वर्षीच्या तिसाव्या बालमेळाव्यात पालकनीती खेळघरमधील युवक गटातील एकूण १२ मुलं स्वयंसेवक म्हणून सहभागी झाली होती. ही मुलं १८ तासांचा प्रवास करून तिथं गेली. खेळघराचे शिक्षक यांच्यासोबत नव्हते. याच मुलांपैकी काही मुलांनी ह्या सफरीची जबाबदारी घेतली होती. मुलं पहिल्यांदाच आपल्या कुटुंबाला सोडून एवढ्या लांब गेली होती. बालमेळ्यासाठी मुलांनी आधी तयारी केली होती. नर्मदा बचाव आंदोलन आणि जीवन-शाळांची माहिती घेतली होती. खेळघरातील युवकांनी बालमेळ्यामधील मुलांना ओरिगामी आणि विविध खेळ शिकवले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमदेखील सादर केले. तिथे ते गावातल्या लोकांच्या घरातच राहत होते, त्यांनी तयार केलेले जेवण जेवत होते. गावातल्या लोकांच्या प्रेमळ वागणुकीनं ही मुलं भारावून गेली. नर्मदा बचाव आंदोलनाच्या मेधाताई पाटकर यांचा या काळात लाभलेला सहवास त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरला.

**सुषमा कोल्हे**

## युवक प्रकल्प –

या वर्षी युवक गटात ४५ च्या वर मुलं आहेत. दहावीनंतरदेखील मुलांना खेळघरातून पुढील शिक्षण घेण्यासाठी सल्ला आणि आर्थिक मदत मिळावी, कठीण मनस्थितीत समुपदेशन मिळावं, स्वतःच्या भविष्याला आकार देण्यासाठी वेगवेगळ्या संधी आणि प्रेरणा मिळावी या ध्येयासाठी युवक गटात काम होतं.

दर आठवड्याला मुलांसाठी एका सत्राची योजना केलेली असते. या व्यतिरिक्त नर्मदा बाल मेळा, लोकशाही उत्सव, बेबाक कलेक्टीव, सर्वोदय युवा मंथन सारख्या संस्थांच्या कार्यशाळा, पुण्यात घडणाऱ्या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग अशा संधी देखील उपलब्ध करून दिल्या जातात. या वर्षी सुट्टीमध्ये मुलांसमोर स्वतः निवडून, आखणी करून – इंग्लिश शिकणं, संगीत किंवा नृत्य शिकणं, वाचनाची आवड विकसित करणं असे काही प्रकल्प पूर्ण करण्याचं आव्हान ठेवलं होतं. काही मुलांनी हे आव्हान नेटानं पूर्ण केलं मात्र काही मुलं ते घेऊ शकली नाहीत. सातत्यानं, लक्षपूर्वक एखादं काम पूर्ण करण्याची क्षमता मुलांमध्ये कशी निर्माण होईल हा अजूनही प्रश्नच आहे.

चांगली गोष्ट म्हणजे या वर्षी सुषमा कोल्हे यांनी या गटाच्या समन्वयाची जबाबदारी घेतली आहे. योग्य कोर्स निवडायला मदत आणि शैक्षणिक मदतीचं काम प्रियांका पाटील करत आहेत.

**यावर्षी आम्ही सोशिल मिडीयावरूनही खेळघर अधिक लोकांपर्यंत पोहचावं म्हणून प्रयत्न करणार आहोत. संपर्कात राहू या.**




# आमंत्रण

या वर्षी खेळघराच्या उपक्रमाला तीस वर्षे पूर्ण होत आहेत. या काळातले आमचे साथी म्हणजे खेळघराचे आजी–माजी विद्यार्थी आणि कार्यकर्ते! यांच्यासमवेत हा सोहळा साजरा करायचा ठरवला आहे.

रविवार दिनांक २ ऑगस्ट रोजी ५ ते ८ या वेळात एस. एम. जोशी फौन्डेशनच्या पहिल्या मजल्यावरच्या हॉलमध्ये थेट भेट हा कार्यक्रम ठरवला आहे. या कार्यक्रमासाठी आपल्याला मनःपूर्वक आमंत्रण!

५ ते ६ या वेळात चहापानाबरोबर आपल्याला मुलांशी संवाद साधायची संधी असेल. ६ ते ८ या वेळात मुलांचा कौतुक समारंभ आणि मनोगते यांच्या जोडीला ३० वर्षांच्या खेळघराच्या वाटचालीबद्दल जाणून घेता येईल.

**खेळघर कार्यकर्ते**
**पत्ता : गुरुप्रसाद अपार्टमेंट,**
**२३ आनंद निकेतन सोसायटी,**
**कर्वेनगर, पुणे ४११०५२.**
**मोबाईल – ९७६३७ ०४९३०**

## खेळघर, पालकनीती परिवाराचा उपक्रम

संपर्क

गुरुप्रसाद अपार्टमेंट, २३, आनंदनिकेतन सोसायटी, कर्वेनगर, पुणे–४११०५२. फोन – ९८२२८७८०९६, ९८२२०९४०९५, ९७६३७०४९३०.
**E-mail: khelghar@gmail.com**
**Website : www.palakneeti.in**

**Khelghar YouTube channel:**
https://www.youtube.com/khelghar
**Facebook:** https://www.facebook.com/khelgharpune
**Insta:** https://www.instagram.com/khelghar_pune



Account Name - **PalaknitiPariwar**
Bank Name : State Bank Of India
Account NO : 35689944253
Type of Account: Current
IFSC Code: SBIN0001110
Branch Code : 01110
Branch : Deccan Gymkhana

**QR स्कॅन केला की यू ट्यूब वर आपल्याला खेळघराची फिल्म बघता येईल.**